**नोटीस**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६**

**नंदुरबार प्रदेशाची प्रारुप प्रादेशिक योजना उक्त अधिनियमाच्या कलम १६(१) अन्वये प्रसिध्द करणे बाबत.**

या नोटीस अन्वये असे सूचित करण्यात येते की, **नंदुरबार** प्रदेशाची प्रारुप प्रादेशिक योजना तयार करण्यात आलेली असून त्यास **नंदुरबार** प्रादेशिक नियोजन मंडळाने दि.०४/०३/२०१७ रोजीच्या मंडळाच्या सभेत ठराव क्र.०१ अन्वये मान्यता दिल्यानुसार आता ती महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ च्या कलम-१६ अन्वयेच्या तरतुदीनुसार प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रारुप प्रादेशिक योजनेच्या प्रती जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात (कार्यालयीन कामाच्या वेळेत) उपलब्ध आहेत.

(१) जिल्हाधिकारी, **नंदुरबार**.
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, **नंदुरबार**.
(३) **नंदुरबार** प्रादेशिक नियोजन मंडळाचे कार्यालय पत्ता :- नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, नंदुरबार शाखा, नंदुरबार, कक्ष क्र.२२५, २रा मजला, मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नंदुरबार.

प्रारुप प्रादेशिक योजनेच्या नकाशा, अहवाल, प्रारुप विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीसह जनतेच्या माहिती करीता/योग्य ती फी आकारुन विक्री करिता मंडळाच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत, उपलब्ध राहतील. सदर तपशिल नागरीकांच्या माहितीकरीता जिल्हाधिकारी, नंदूरबार यांच्या वेबसाईटवर देखील (www.nandurbar.nic.in) उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रारुप प्रादेशिक योजना नकाशा तसेच प्रारुप विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील तरतुदीबाबत नागरीकास काही सूचना किंवा हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून **४ (चार) महिन्याचे** मुदतीत प्रादेशिक नियोजन मंडळाकडे लेखी स्वरुपात आवश्यक कागदपत्रासह सादर करावयात. सदर सूचना व हरकतीचा नियोजन समिती योग्य तो विचार करुन त्यावरील अहवाल प्रादेशिक नियोजन मंडळामार्फत शासनास सादर करेल.

**क्रमांक ससंनर-नंदुरबार/प्रा.यो.नंदुरबार/सूचना/**
नंदुरबार, दिनांक :

**(रा.म.पवार)**
**सदस्य सचिव,**
**प्रादेशिक नियोजन मंडळ,**
**तथा**
**सहाय्यक संचालक, नगर रचना,**
**नंदुरबार.**

**(डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी)**
**अध्यक्ष**
**प्रादेशिक नियोजन मंडळ,**
**तथा**
**जिल्हाधिकारी,नंदुरबार.**

# Notice

## Maharashtra Regional and Town Planning Act, 1966
## Publication of Nandurbar Regional Plan u/s 16(1) of said act.

Notice is hereby given that the Draft Regional Plan of Nandurbar Region has been approved for Publication by Regional Planning Board, Nandurbar in its meeting Dated 04/03/2017 vide Resolution No. 01 is here-by published in the manner laid down u/s 16 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Copies of the Draft Regional Plan along with report and standardize development control and promotion regulations are made available for inspection of General public in the following offices during office hours.

(1) Collector, Nandurbar.
(2) Chief executive Officer, Zilla Parishad, Nandurbar.
(3) Office of the Nandurbar Regional Planning Board Address: - **Town Planning and Valuation Dept. Assistant Director of Town Planning, Nandurbar Branch, Nandurbar, Office No.225, 2nd Floor, Central Administrative Building, Collector Office Premises, Nandurnar.**
(4) Copies of the Draft Regional Plan along with Report, Standardize D.C.P.R. will be available for sale to public at a reasonable price at the office of the Regional Planning Board on all working days. This information is also made available on the website (www.nandurbar.nic.in) of Nandurbar collector.

Any objections or suggestions stating reasons with respect to the Draft Regional Plan may be submitted in writing to the Regional Planning Board before the expiry of **4 Months (Four Months)** from the date of publication of this notice in Government Gazette which will be considered by the Regional Planning Committee while submitting its report to the Government through Regional Planning Board.

**(R.M.Pawar)**
Member Secretary
Regional Planning Board &
Assistant Director of
Town Planning,Nandurbar.

**(Dr. Mallinath Kalshetti)**
Chairman
Regional Planning Board &
Collector Nandurbar